महाराष्ट्र शासन

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती.

पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, टी.बी. हॉस्पीटलच्या मागे, अमरावती-४४४६०२.

दुरध्वनी क्र. : ०७२१-२५५३९६६, २५५३९६७ ई-मेल : atc.amr-mh@gov.in

जा.क्र. आस्था-२६/ शिक्षक भरती/प्र.क्र.१७/का.१ (क)/4580 अमरावती दि. ७ सप्टेंबर, २०२६

जाहिर सुचना
शिक्षक पदभरती २०२६

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक पदांची पदभरती प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. सदर पदभरतीच्या अनुषंगाने दिनांक ०६.०८.२०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. पवित्र पोर्टलद्वारे दिनांक २७.०८.२०२६ रोजी फेज-१ अंतर्गत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी या कार्यालयामार्फत करण्यात आली. याबाबत दिनांक ०१.०९.२०२६ रोजी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर सूचना प्रसिद्ध करून तसेच संबंधित उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. तथापि, सदर निर्धारित कालावधीत कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित राहू न शकलेल्या काही उमेदवारांनी त्यांना कागदपत्रे पडताळणीची संधी देण्याबाबत या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

२. त्याअनुषंगाने, दिनांक ०३.०९.२०२६ ते ०५.०९.२०२६ या कालावधीत अनुपस्थित राहिलेल्या सर्व उमेदवारांनी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी बुधवार, दिनांक ०९.०९.२०२६ सकाळी १०.०० वाजता अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

३. दिनांक ०९.०९.२०२६ रोजी कागदपत्रे व प्रमाणपत्रे पडताळणीसाठी अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना यानंतर कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. कागदपत्रे व प्रमाणपत्रे पडताळणीसंदर्भातील इतर सर्व सूचना दिनांक ०१.०९.२०२६ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर सूचनेप्रमाणेच लागू राहतील.

५. सदर जाहीर सूचना तसेच शिफारसप्राप्त उमेदवारांच्या याद्या विभागाच्या https://tribal.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

Sd/-

(संदिप गोलाईत)
अपर आयुक्त
आदिवासी विकास, अमरावती.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती.

पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, टी.बी. हॉस्पीटलच्या मागे, अमरावती-४४४६०२.
दुरध्वनी क्र. : ०७२१-२५५३९६६, २५५३९६७ ई-मेल : atc.amr-mh@gov.in

जा.क्र. आस्था-२६/ शिक्षक भरती/प्र.क्र.१७/का.१ (क)/ 4581 अमरावती दि. **७ सप्टेंबर, २०२६**

प्रति,

मा. आयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक.

विषय :- पवित्र (PAVITRA) पोर्टल शिक्षक पदभरती कागदपत्रे व प्रमाणपत्रे पडताळणीस अनुपस्थित उमेदवारांना पडताळणीची अंतिम संधी देण्याबाबतची जाहिर सूचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) पवित्र पोर्टलव्दारे शिक्षक पदभरती जाहिरात दिनांक ०६.०८.२०२६.
२) पवित्र पोर्टलव्दारे शिफारसप्राप्त उमेदवारांची प्रसिध्द केलेली यादी दि. २७.०८.२०२६.
३) मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे अध्यक्षतेखालील प्रादेशिक निवड समिती बैठक दि. ०१.०९.२०२६ कार्यवृत्त.
४) या कार्यालयाने प्रसिध्द केलेली दि. ०१.०९.२०२६ रोजीची जाहिर सूचना.

महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते की, अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक संवर्गातील ४६८ रिक्त पदांची पदभरती जाहिरात दिनांक ०६.०८.२०२६ रोजी पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली असून, मुलाखतीशिवाय निवड प्रक्रियेत शिफारसप्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक २७.०८.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुषंगाने कागदपत्र पडताळणीस अनुपस्थित उमेदवारांना अंतिम संधी दि. ०९.०९.२०२६ रोजी देण्याबाबतची जाहिर सूचना आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

संलग्न :- जाहिर सूचना.

आपला विश्वासू,

(संदिप गोलाईत)
अपर आयुक्त
आदिवासी विकास, अमरावती.